महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

## सहायक मोटार वाहन निरीक्षक मुख्य परीक्षा - २०२०

**अधिसूचना क्रमांक : एनओटी-३६१७/सीआर-२४/२०२०/तीन** **जाहिरात क्रमांक : ०५९/२०२१**

जाहिरात क्रमांक ०२/२०२०, दिनांक १७ जानेवारी, २०२० नुसार शासनाच्या गृह (परिवहन)विभागांतर्गत मोटार वाहन विभागातील **सहायक मोटार वाहन निरीक्षक, गट-क** संवर्गातील **खाली नमूद केल्याप्रमाणे** एकूण **२४०** पदांवरील भरतीकरीता, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक १५ मार्च, २०२० रोजी घेण्यात आलेल्या सहायक मोटार वाहन निरीक्षक पूर्व परीक्षा - २०२० च्या निकालाआधारे, मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची **सहायक मोटार वाहन निरीक्षक मुख्य परीक्षा - २०२० शनिवार, दिनांक ३० ऑक्टोबर, २०२१ रोजी औरंगाबाद, अमरावती, मुंबई, नागपूर, नाशिक व पुणे** या जिल्हाकेंद्रांवर घेण्यात येईल :-

| **सहायक मोटार वाहन निरीक्षक, गट-क** | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्रवर्ग** | **अ.जा.** | **अ.ज.** | **वि.जा. (अ)** | **भ.ज. (ब)** | **भ.ज. (क)** | **भ.ज. (ड)** | **इ.मा.व.** | **वि.मा. प्र.** | **आ.दु.घ.** | **एकूण आरक्षित पदे** | **अराखीव पदे** | **एकूण पदे** |
| पदसंख्या | २५ | १६ | ६+३* | ५+२१* | ७+३* | ४ | ३६+१९* | ४+४* | २४ | १७७ | ६३ | २४० |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १२ | ८ | ५ | १३ | ४ | २ | २७ | ५ | १२ | ८८ | ३० | ११८ |
| महिला | ८ | ५ | ३ | ८ | ३ | १ | १७ | २ | ७ | ५४ | १९ | ७३ |
| खेळाडू | १ | १ | -- | १ | १ | -- | ३ | -- | १ | ८ | ४ | १२ |
| माजी सैनिक | ४ | २ | १ | ४ | २ | १ | ८ | १ | ४ | २७ | १० | ३७ |
| अनाथ | एकूण पदे - २ | | | | | | | | | | | |
| * अनुशेषाची पदे | | | | | | | | | | | | |

### २. पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-

**२.१** वर नमूद पदसंख्या व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.२** महिला, खेळाडू, अनाथ व माजी सैनिकांसाठी असलेले समांतर आरक्षण हे कप्पीकृत (Compartmentalised) आहे.

**२.३** महिला, खेळाडू, माजी सैनिक व अनाथांसाठीचे आरक्षण हे शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**२.४** महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत तसेच नॉन क्रीमीलेअर मध्ये मोडत असल्याबाबत (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

**२.५** विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

**२.६** समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**२.७** आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक ३१ मे, २०२१ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

**२.८** सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील उमेदवारांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीच्या आरक्षणाचा दावा केला असल्यास संबंधित उमेदवारांना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : राआधो-४०१९/प्र.क्र३१/१६-अ, दिनांक ०६ जुलै, २०२१ अनुसार प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

**२.९** सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. याबाबतचा तपशील वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**२.१०** अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पुर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

**२.११** सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

**२.१२ खेळाडू आरक्षण :-**

**२.१२.१** शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६, तसेच शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक:राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६, शुध्दीपत्रक क्रमांक:राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ११ मार्च, २०१९ व शासन शुद्धिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक २४ ऑक्टोबर, २०१९ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**२.१२.२** प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र पूर्व परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

**२.१२.३** खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे पूर्व परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडूसाठी आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

**२.१२.४** कागदपत्रे पडताळणी/मुलाखतीच्यावेळी खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीचा सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारशी/नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल.

**२.१२.५** एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणा-या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

**२.१३ दिव्यांग आरक्षण :-**

शासन निर्णय, गृह (परिवहन) विभाग, क्रमांक:एमव्हीडी-०२२१/प्र.क्र.६३/परि-४, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२१ अन्वये सदर संवर्गाकरीता दिव्यांग आरक्षण लागू करण्यात आलेले नाही.

**२.१४ अनाथ आरक्षण :-**

**२.१४.१** अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक : अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दिनांक २३ ऑगस्ट, २०२१ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार राहील.

**२.१४.२** पूर्व परीक्षेच्या अर्जाद्वारे अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी त्यांचेकडे सद्यस्थितीत उपलब्ध असलेले प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. तसेच दिनांक २३ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार सुधारित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व अधिवास प्रमाणपत्र आयोगाकडून निश्चित करण्यात येणाऱ्या विहित कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**२.१४.३** पूर्व परीक्षेच्या अर्जाद्वारे अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी मुख्य परीक्षेकरीता अर्ज सादर करतानाच त्यांचा जातीचा दावा (लागू असेल त्याप्रमाणे) नमूद करणे बंधनकारक आहे.

**२.१५** सेवा भरतीची संपूर्ण प्रक्रिया सहायक मोटार वाहन निरीक्षक सेवा प्रवेश नियम २०१६ अथवा तदनंतर शासनाकडून वेळोवेळी करण्यात येणा-या सुधारणा तसेच आयोगाच्या प्रचलित कार्यपद्धतीनुसार राबविण्यात येईल.

**३. वेतनश्रेणी :-**

**३.१** एस-१४ रूपये ३८,६००-१,२२,८०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते.

**४. पात्रता :-**

४.१ भारतीय नागरिकत्व

**४.२ वयोमर्यादा :-**

| **वयोमर्यादा गणण्याचा दिनांक** | **किमान वय** | **कमाल वय** | | | | | | **दिव्यांग उमेदवार** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **सर्वसाधारण** | | **प्राविण्य प्राप्त खेळाडू** | | **माजी सैनिक** | | |
| | | **अमागास** | **मागासवर्गीय/ अनाथ** | **अमागास** | **मागासवर्गीय** | **अमागास** | **मागासवर्गीय** | |
| १ मे, २०२० | १९ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ + सेवा कालावधी + ३ वर्ष | ४३ + सेवा कालावधी + ३ वर्ष | अपात्र |

**४.३** विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**४.४ शैक्षणिक अर्हता :-**

**४.४.१** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (एस.एस.सी.) किंवा महाराष्ट्र शासनाने एस.एस.सी. च्या समतुल्य म्हणून घोषित केलेली अर्हता, आणि

**४.४.२** माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर स्वयंचल अभियांत्रिकी (Automobile Engineering) वा यंत्र अभियांत्रिकी (Mechanical Engineering) विषयातील किमान ३ वर्षाची पदविका वा केंद्र वा राज्य शासनाने त्यास समकक्ष म्हणून घोषित केलेली अर्हता.

**४.४.३** स्वयंचल अभियांत्रिकी (Automobile Engineering) वा यंत्र अभियांत्रिकी (Mechanical Engineering) विषयातील मान्यता प्राप्त विदयापीठाची पदवी किंवा त्यापेक्षा अत्युच्च अर्हता धारण केलेले वा केंद्र वा राज्य शासनाने त्यास समकक्ष म्हणून घोषित केलेल्या अर्हता धारण केलेले उमेदवार देखील पात्र राहतील.

४.४.४ खालील अर्हता समतुल्य शैक्षणिक अर्हता म्हणून स्वीकारार्ह आहेत :-

| अ.क्र. | संदर्भ | अर्हता |
|---|---|---|
| १ | शासन पत्र, गृह विभाग, क्रमांक: एमव्हीडी-१२१६/प्र.क्र.-३०१/परि-३, दिनांक २३ जानेवारी, २०१७ | (१) डिप्लोमा इन प्रॉडक्शन टेक्नॉलॉजी<br>(२) डिप्लोमा इन प्रॉडक्शन इंजिनिअरिंग<br>(३)डिप्लोमा इन मशिन टूल्स मेन्टेनन्स<br>(४)डिप्लोमा इन फॅब्रिकेशन टेक्नॉलॉजी<br>(५)डिप्लोमा इन फॅब्रिकेशन अँड इरेक्शन इंजिनिअरिंग<br>(६)डिप्लोमा इन प्लॅन्ट इंजिनिअरिंग<br>(७) डिप्लोमा इन मेटॅलर्जी<br>(८) बॅचलर डिग्री इन मेकॅनिकल इंजिनिअरींग<br>(९) बॅचलर डिग्री इन ॲटोमोबाईल इंजिनिअरींग<br>(१०) बॅचलर डिग्री इन प्रॉडक्शन इंजिनिअरींग<br>(११) बॅचलर डिग्री इन इंडस्ट्रिअल इंजिनिअरींग |
| २ | शासन पत्र, गृह विभाग, क्रमांक: एमव्हीडी-१२१६/प्र.क्र.-३०१/परि-३, दिनांक १५ फेब्रुवारी, २०१७ | डिप्लोमा इन मेकॅट्रॉनिक्स इंजिनिअरिंग |
| ३ | शासन पत्र, गृह विभाग, क्रमांक: एमव्हीडी-१२१६/प्र.क्र.-३०१/परि-३, दिनांक १६ फेब्रुवारी, २०१७ | डिप्लोमा इन पॅकेजिंग टेक्नॉलॉजी |
| ४ | शासन पत्र, गृह विभाग, क्रमांक: एमव्हीडी-१२१६/प्र.क्र.-३०१/परि-३, दिनांक १८ फेब्रुवारी, २०१७ | 4 Years Theoretical and Practical Training as an Artificer Apprentice |

४.४.५ सहायक मोटार वाहन निरीक्षक मुख्य परीक्षा - २०२० च्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांनी सहायक मोटार वाहन निरीक्षक मुख्य परीक्षा - २०२० करीता अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकापर्यंत संबंधित शैक्षणिक अर्हता धारण करणे अनिवार्य आहे.

४.४.६ अंतर्वासिता (Internship) किंवा कार्यशाळेतील कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवी धारण करणा-या उमेदवारांनी सदर अट मुख्य परीक्षेचा अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पूर्ण केली असेल तरच त्याला पदवीधर समजण्यात येईल.

४.४.७ मराठी लिहिणे, वाचणे, बोलता येणे अत्यावश्यक आहे.

**४.५ अनुभव :-**

४.५.१ स्वयंचल अभियांत्रिकी वा यंत्र अभियांत्रिकी मधील पदविका/पदवी/अत्युच्च अर्हता अथवा वरीलप्रमाणे समकक्ष अर्हता धारण केल्यानंतर मुख्य परीक्षेकरीता अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकास हलकी मोटार वाहने, जड मालवाहू वाहने व जड प्रवासी वाहने यांचे दुरुस्ती व देखभाल करण्याचा पूर्ण वेळ कर्मचारी म्हणून केंद्र अथवा राज्य शासनाच्या विभागामध्ये वा अंगीकृत व्यवसायांचे अखत्यारीतील यंत्रशाळामध्ये घेतलेला अथवा शासन वेळोवेळी निर्देशित करेल अशा संस्थांमध्ये घेतलेला किमान एक वर्ष कालावधीचा अनुभव आवश्यक .

४.५.२ अनुभवाच्या प्रयोजनार्थ प्रशिक्षणार्थी अथवा ॲप्रेंटिस म्हणून वरील ठिकाणी घेतलेला अनुभव गृहित धरला जाऊ शकेल.

४.५.३ मुख्य परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकास वर नमूद केल्याप्रमाणे किमान एक वर्ष कालावधीचा पूर्ण वेळ कर्मचारी म्हणून अनुभव नसेल त्यांनी नियुक्तीनंतर परिवीक्षाधीन कालावधीमध्ये शासनाच्या विभागात अथवा अंगीकृत व्यवसायामध्ये अथवा शासन वेळोवेळी निर्देशित करेल अशा संस्थांमध्ये किमान १ वर्ष कालावधीचा अनुभव घेणे बंधनकारक राहील.

**४.६ वैध अनुज्ञप्ती (License):-**

४.६.१ मुख्य परीक्षेकरीता अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास, वैध असणारी गिअर्स असलेली मोटार सायकल, हलके मोटार वाहन आणि परिवहन वाहन (जड मालवाहू वाहन आणि जड प्रवासी वाहन) या संवर्गासाठी सक्षम प्राधिका-याने दिलेली वैध अनुज्ञप्ती (License) आवश्यक.

४.६.२ अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वर नमूद केल्याप्रमाणे जड माल वाहतूक वाहन किंवा जड प्रवासी वाहतूक वाहन यापैकी एखादी किंवा दोन्ही वाहने चालविण्याची अनुज्ञप्ती **(License)** नसेल तर अशा उमेदवारास अशी अनुज्ञप्ती, नियुक्ती नंतरच्या दोन वर्षाच्या परिवीक्षा कालावधीमध्ये प्राप्त करणे बंधनकारक असेल.

४.६.३ परिवीक्षा कालावधीमध्ये अशी अनुज्ञप्ती प्राप्त न करणा-या उमेदवारास सेवेतून कमी करण्यात येईल.

४.६.४ वाहन चालविण्याची अनुज्ञप्ती वेळोवेळी नूतनीकरण केली असली पाहिजे .

**४.७ शारीरिक अर्हता :-**

४.७.१ शारीरिक अर्हता खालीलप्रमाणे आवश्यक :-

| पुरुष उमेदवार | महिला उमेदवार |
|---|---|
| (१) **उंची** - १६३ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>**(२) छाती** - किमान ७९ से.मी. (प्रसरणाशिवाय)<br>व किमान ५ से.मी. (प्रसरण) | **(१) उंची** - १५५ सें.मी. (अनवाणी)<br>(कमीत कमी )<br>**(२) वजन** - ४५ कि. ग्रॅ. (कमीत कमी ) |

४.७.२ जे रंगांध नसून, ज्यांची दृष्टी चष्म्यासह वा चष्म्याशिवाय चांगली आहे.

**५. सेवाप्रवेशोत्तर शर्ती** :-

**५.१** वर नमूद केल्याप्रमाणे परिवीक्षा कालावधीत नमूद अनुभव व अनुज्ञप्तीच्या अटींची पूर्तता करेपर्यंत सदर उमेदवारास सहायक मोटार वाहन निरीक्षक पदाची कोणतीही कर्तव्ये अथवा जबाबदा-या पार पाडता येणार नाहीत.

**५.२** नियुक्त केलेली व्यक्ती दोन वर्षाच्या कालावधीकरीता परिवीक्षाधीन असेल. परिवीक्षाधीन कालावधी जास्तीत जास्त एका वर्षापर्यंत वाढविता येईल.

**५.३** परिवीक्षाधीन कालावधीमध्ये विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आणि विहित केलेले प्रशिक्षण (कोणतेही असल्यास) पूर्ण करणे आणि परिवीक्षाधीन कालावधी यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक असेल. जर विहित केलेली विभागीय परीक्षा किंवा प्रशिक्षण किंवा परिवीक्षाधीन कालावधी यशस्वीरित्या पूर्ण केला नाही तर ती व्यक्ती सेवा समाप्त करण्यास पात्र राहील.

**५.४** परिवीक्षाधीन कालावधी यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर किमान पाच वर्षे कालावधीसाठी मोटार वाहन विभागात सेवा करण्याचे बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**५.५** या संबंधात तयार करण्यात आलेल्या नियमानुसार मराठी व हिंदी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण झालेली नसेल किंवा त्याला/तिला परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट मिळालेली नसेल तर त्याने/तिने या परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**५.६** महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित करण्यात आलेले संगणक हाताळणी विषयक प्रमाणपत्र धारण करावे लागेल.

**५.७** सदर पदावर नियुक्त केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली होण्यास पात्र राहील.

**६. परीक्षेचे टप्पे - एक**

**६.१** मुख्य परीक्षा - ३०० गुण

**६.२** मुख्य परीक्षेतील एकूण गुणांच्या आधारे विविध सामाजिक व समांतर आरक्षणाच्या अधीन राहून गुणवत्तेनुसार अंतिम निवड करण्यात येईल.

**७. प्रमाणपत्र पडताळणी :-**

**७.१** आयोगाने निश्चित केलेल्या किमान सीमारेषेनुसार शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/ शासन परिपत्रकातील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्रांच्या आधारे नियुक्तीपूर्वी सक्षम प्राधिका-याकडून तपासली जाईल.

**७.२** अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्रे सादर करणा-या उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी केली जाईल.

**७.३** अर्जातील दाव्यानुसार सक्षम प्राधिका-याकडून करण्यात आलेल्या प्रमाणपत्र पडताळणीच्या आधारे पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच नियुक्ती देण्याची कार्यवाही सक्षम प्राधिका-यांकडून करण्यात येईल.

**८. मुख्य परीक्षेकरीता अर्ज करण्याची पध्दत :-**

**८.१ अर्ज सादर करण्याचे टप्पे :-**

**८.१.१** आवश्यक असल्यास खाते अद्ययावत करणे.

**८.१.२** विहित कालावधीत तसेच विहित पध्दतीने खालीलप्रमाणे लागू असेल त्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रे अपलोड करुन अर्ज सादर करणे :-

**(एक)** प्रोफाईलद्वारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने उमेदवारांची पात्रता आजमावल्यानंतर (Check eligibility) उमेदवार जाहिरातीनुसार पात्र ठरत असल्यास अर्ज सादर करताना खालील कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागूअसलेली) अपलोड करणे अनिवार्य आहे :-

| अ.क्र. | प्रमाणपत्रे / कागदपत्रे | फाईल फॉर्मेट | किमान फाईल साईज (KB) | कमाल फाईल साईज (KB) |
|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता | PDF | ५० | ५०० |
| २ | वयाचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ३ | शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ४ | सामाजिकदृष्टया मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ५ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ६ | अद्ययावत नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |
| ७ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ८ | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ९ | खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १० | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ११ | अराखीव महिला, खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |
| १२ | एस.एस.सी. मधील नावात बदल झाल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १३ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १४ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन | PDF | ५० | ५०० |
| १५ | अनुभवाचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १६ | गिअर्स असलेली मोटार सायकल - वैध कायम स्वरुपातील वाहन चालवण्याची अनुज्ञप्ती (Licence) | PDF | ५० | ५०० |
| १७ | हलके मोटार वाहन - वैध कायम स्वरुपातील वाहन चालवण्याची अनुज्ञप्ती (Licence) | PDF | ५० | ५०० |
| १८ | परिवहन वाहन (जड मालवाहू वाहन आणि जड प्रवासी वाहन - वैध कायम स्वरुपातील वाहन चालवण्याची अनुज्ञप्ती (Licence) | PDF | ५० | ५०० |

**(दोन)** उपरोक्त प्रमाणपत्र/कागदपत्रे आयोगाच्या संकेतस्थळावरील ‘उमेदवारांना सर्वसाधारण सूचना’ प्रकरण क्रमांक चार तसेच प्रस्तुत अधिसूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे असणे अनिवार्य आहे.

**(तीन)** संबंधित जाहिरातीस अनुसरुन विहित निकष/पात्रता तसेच प्रोफाईलमधील दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड करावी लागतील. प्रोफाईलमधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अपलोड करावयाची संबधित कागदपत्रे प्रणालीद्वारे अर्ज सादर करताना प्रदर्शित होतील.

**(चार)** पात्रतेसंदर्भातील विविध दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड केल्याशिवाय अर्ज सादर करता येणार नाही.

८.२.३ परीक्षा शुल्काचा भरणा विहित पध्दतीने करणे.

८.२.४ जिल्हा केंद्र निवड करणे.

**८.३ सर्वसाधारण :-**

८.३.१ अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील.

८.३.२ अर्ज सादर करण्याकरीता संकेतस्थळ :- https://mpsconline.gov.in

८.३.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mpsconline.gov.in तसेच https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

८.३.४ आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**८.४ अर्ज सादर करण्याचा कालावधी:- दिनांक ०६ सप्टेंबर, २०२१ रोजी १४.०० वाजल्यापासून दिनांक २० सप्टेंबर, २०२१ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.**

**८.५ शुल्क :-**

८.५.१ अमागास - ५४४/-

८.५.२ मागासवर्गीय - ३४४/-

८.५.३ माजी सैनिक - ४४/-

८.५.४ उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

८.५.५ परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-refundable) आहे.

८.६ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा:-

८.६.१ शुल्क भरण्याकरीता मुख पृष्ठावरील 'माझे खाते' या लिंक वर क्लिक करावे.

८.६.२ 'माझे खाते' या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. 'Unpaid' लिहिलेल्या जाहिरात / पद / परीक्षेसमोर ' Pay Now' अशी लिंक उपलब्ध असेल.

८.६.३ 'Pay Now' या लिंक वर क्लिक केल्यानंतर दोन पर्याय उपलब्ध होतील:- (१) ऑनलाईन पेमेंट (२) चलनाद्वारे

८.६.४ क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, युपीआय अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल.

८.६.५ ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा झाला आहे किंवा कसे याची स्थिती (status) लगेचच अवगत होईल. ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरले असल्याबाबत Logout करण्यापूर्वीच खात्री करणे अथवा परीक्षा शुल्काचा भरणा झाल्याबाबतची स्थिती उपलब्ध नसल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याबाबतची कार्यवाही प्रस्तुत परीक्षेच्या अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच करणे आवश्यक आहे.

८.६.६ ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा करताना बँकेकडून व्यवहार (Transaction) पूर्ण झाला असल्याबाबत खात्री करण्याची जबाबदारी उमेदवाराची आहे. कोणत्याही कारणास्तव व्यवहार अयशस्वी ठरल्यास यासंदर्भातील तक्रारीची आयोगाकडून दखल घेतली जाणार नाही.

८.६.७ चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

८.६.८ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

८.६.९ **ऑनलाईन परीक्षा** शुल्क भरणे तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेणे याकरीता विहित **अंतिम दिनांक २० सप्टेंबर, २०२१ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.**

८.६.१० चलनाद्वारे **परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास** भारतीय स्टेट बँकेमध्ये **शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक २१ सप्टेंबर,** २०२१ - **बँकेच्या कार्यालयीन वेळेत.**

**८.७ जिल्हा केंद्र निवड :-**

८.७.१ अर्ज सादर करतानाच जिल्हा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे.

८.७.२ जिल्हा केंद्र बदलाबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत अथवा कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**९. प्रवेशप्रमाणपत्र :-**

९.१ परीक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेशप्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावर (https://mpsconline.gov.in) उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे ७ दिवस अगोदर उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

९.२ परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

९.३ प्रवेश प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात आल्यानंतर उमेदवाराला त्याच्या आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे कळविण्यात येईल. याबाबतची घोषणा आयोगाच्या संकेतस्थळावर परीक्षेपूर्वी एक सप्ताह अगोदर प्रसिद्ध करण्यात येईल.

९.४ परीक्षेच्या दिनांकापूर्वी ३ दिवस अगोदर प्रवेश प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास अर्ज सादर केल्याच्या आवश्यक पुराव्यासह आयोगाच्या कार्यालयाकडे संपर्क साधावा.

९.५ परीक्षेच्यावेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही **एक मूळ ओळखपत्र** तसेच मूळ ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

**९.६** आधार कार्डच्या ऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणा-या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवाराचे नाव, पत्ता, लिंग, फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Aadhaar generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यासच तसेच सुस्पष्ट फोटोसह **रंगीत प्रिंट** मध्ये आधार डाऊनलोड केले असल्यासच ई-आधार वैध मानण्यात येईल.

**९.७** नावांमध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहित स्त्रियांच्या बाबतीत), नावांत बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावांत बदल झाल्यासंबंधीचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१०.** प्रस्तुत अधिसूचनेमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील स्पर्धा परीक्षेअंतर्गत '**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**' तसेच "**परीक्षा योजना**" विभागातील '**सहायक मोटार वाहन निरीक्षक मुख्य परीक्षा**' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व अधिसूचना अधिकृत समजण्यात येईल.

**११.** सदर अधिसूचना आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई.
दिनांक : **०२ सप्टेंबर, २०२१**

सह सचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. (२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.